कोठल्याही पद्धतीचे आरक्षण असू नये असेच मला वाटते. परंतु, नियमाला अपवाद असतोच. कोठल्याही शर्यतीत सर्व स्पर्धक समान पातळीवर असतील तर आरक्षणाची आवश्यकताच भासणार नाही. एव्हरेस्टचे शिखर पादाक्रात करण्याच्या शर्यतीत जर कांही स्पर्धक पुण्याहून निघाले व त्याच वेळी कांही काठमांडूहून निघाले तर पुण्याहून निघणाऱ्या स्पर्धकाना विजय कितपत शक्य आहे? स्त्रियाना हजारो वर्षे जवळ जवळ कांहीच अधिकार नव्हते. घराबाहेरील जगापासून त्याना दूर ठेवले होते. म्हणून स्त्रियासाठी राजकारणासहित सर्व ठिकाणी आरक्षण असलेच पाहिजे.

पुरुषप्रधान लोकसभेमध्ये स्त्रियाना निवडणूकीमध्ये आरक्षण बिलाला सूर्यप्रकाश केंव्हा दिसेल याची शाश्वती नाही. यावर एक उत्तम उपाय आहे. सध्या सगळीकडे युती आघाडी शासनांचा सुकाळ आहे. त्यामधील घटकपक्ष पाहिजे त्या अटी घालतात. तेंव्हा येत्या निवडणूकीत सर्व स्त्रियानी आपले पक्ष तात्पुरते सोडून महिला आघाडी स्थापन करावी. या आघाडीने आरक्षण बिल मंजूर करणाऱ्या पक्षाला आपला पाठिंबा द्यावा. बिल मंजूर झाल्यावर सर्व महिलानी परत आप आपल्या पक्षात पाहिजे तर जावे .